**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 DBEE Office: 0231-2609068
Engg. & Tech. Exam .Section: 0231-2609122 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– 416004, महाराष्ट्र
Estd. 1962 दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 0091-0231-2609000 संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालय : 0231-2609068
NAAC 'A' Grade अभियांत्रीकी व तंत्रज्ञान परीक्षा विभाग : 0231-2609122 फॅक्स : 0091-0231-2690655
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ई मेल coe@unishivaji.ac.in

---

संदर्भः जा.क्र. परीक्षा/1586 Date : 27 / 03 /2019

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये

विषयः– प्रवेशपत्रावर परीक्षार्थींचे फोटो आणि स्वाक्षरी नसणेबाबत.

महोदय/महोदया,

दि. 26/03/2019 पासून उन्हाळी परीक्षा सुरू झालेल्या आहेत. तांत्रिक कारणास्तव काही परीक्षार्थींच्या प्रवेशपत्रावर परीक्षार्थींचे फोटो आणि स्वाक्षरी नसल्याचे परीक्षा विभागाच्या निदर्शनास आलेले आहे.

यासंदर्भात आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की,

1) ज्या परीक्षार्थींच्या प्रवेशपत्रावर फोटो आणि स्वाक्षरी नाही अशा परीक्षार्थींच्या प्रवेशपत्रावर संबंधितांचा फोटो चिकटवून जबाबदार अधिका–याकडून तो साक्षांकित करावा तसेच विद्यार्थ्यांची समक्ष स्वाक्षरी सदर प्रवेशपत्रावर घेण्यात यावी. सर्व महाविद्यालयांनी असे प्रवेशपत्र ग्राहय धरावे व त्याप्रमाणे परीक्षेस बसू द्यावे.

2) उपरोक्त प्रमाणे साक्षांकित केलेले प्रवेशपत्र न घेता परीक्षार्थी परीक्षेस उपस्थित असतील तर अशा परीक्षार्थीबाबत त्यांच्याकडे उपलब्ध असणारे कोणतेही फोटो असणारे शासनग्राहय ओळखपत्र ( उदा. पॅनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट ) ग्राहय धरून संबंधित परीक्षार्थीस परीक्षा देण्यास परवानगी देण्यात यावी.

3) मूळ प्रवेशपत्रावर फोटो आणि स्वाक्षरी नाही या कारणास्तव कोणताही परीक्षार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची कृपया दक्षता घ्यावी.

आपला विश्वासू,

सहाय्यक कुलसचिव

प्रतः–

1. परीक्षा प्रमाद विभाग– उपरोक्त आदेश तातडीने सर्व भरारी पथकांना पोहच करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.